**प्रसिध्दी पत्रक** दिनांक : २३/११/२०२४

## कुंटूरकर निवासी दिव्यांग कार्यशाळा, राज कॉर्नर, नांदेड येथील कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन काढण्यासाठी ४०,००,०००/– रूपयांची लाच स्विकारली म्हणुन लोकसेव शिवराज बामणे, सह दोन आरोपी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | भाग्यनगर |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गुरनं ५९०/२०२४ कलम ७ अ भ्र.प्र.अ.१९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दि.२३.११.२०२४ चे ०२.१० वाजता स्टे.डा नोंद नं ०३ वर |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १) शिवराज विश्वनाथ बामणे, पद – लिपिक, नेम. छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालय, काबरा नगर, नांदेड, रा. हरि ओम नगर, नांदेड.<br>२) यादव मसनाजी सुर्यवंशी, पद मुख्याध्यापक, नेम. वैभव निवासी शाळा, खानापुर, ता. देगलूर, जि. नांदेड, रा. एमजीएम कॉलेज समोर, नांदेड.<br>३) चंपत आनंदराव वाडेकर, पद लिपिक, नेम. कुटूंरकर निवासी दिव्यांग कार्यशाळा, राज कॉर्नर, नांदेड, रा. ओंकारेश्वर नगर, नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ५४,००,०००/– |
| लाच स्विकारली रक्कम | रु. ४०,००,०००/– |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांचे कुंटूरकर निवासी दिव्यांग कार्यशाळा, राज कॉर्नर, नांदेड येथील कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबीत आहे. सदरील वेतन समाजकल्याण अधिकाऱ्यांकडून मंजूर करून घेण्यासाठी आरोपी लोकसेवक यादव सुर्यवंशी, शिवराज बामणे यांनी रुपये ५४,००,०००/– लाचेची मागणी केली. तक्रारदाराने बोलचाल करून ४८,००,०००/– रुपये देण्याची तयारी सांगितल्यावर त्यांचे देयक मंजूर करण्यात आले व त्यातून बँकेतून लाचेची रक्कम काढून आणून देण्यास तक्रारदारास सांगण्यात आले .<br>सदरची रक्कम ही लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाल्याने व त्यांना संबंधितांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी त्यांचे दिव्यांग कार्यशाळेतील कर्मचाऱ्यांचे वतीने याबाबत तक्रार दिली.<br>नमुद तक्रारीवरून ला.प्र.वि., नांदेड कडून दि. १३/११/२०२४, दि. १५/११/२०२४, १७/११/२०२४, दि. १८/११/२०२४ व दि.२२/११/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्यात आली. सदर पडताळणीत आलोसे यादव सुर्यवंशी, शिवराज बामणे व चंपत वाडेकर यांनी तक्रारदार यांना पंचासमक्ष प्रत्यक्ष व फोनद्वारे वेळोवेळी प्रलंबीत बिल अदा केल्याचा मोबदला म्हणून ५४,००,०००/– रूपये लाचेची मागणी केल्याचे आढळून आले.<br>त्यानंतर दि.२२/११/२०२४ रोजी आरोपी लोकसेवक शिवराज बामणे व चंपत वाडेकर हे छत्रपती चौकाजवळील विरसा मुंडा चौकात तक्रारदार यांच्याकडून ठरलेल्या लाचेच्या रक्कमेपैकी ४०,००,०००/– रूपये लाच स्विकारून व आरोपी लोकसेवक शिवराज बामणे हे तक्रारदार यांना त्यांचे मोटार सायकलवर बसवून घेवून जात असतांना रंगेहाथ मिळून आले आहे.<br>यातील आरोपी लोकसेवक शिवजराज बामणे व चंपत वाडेकर यांना ताब्यात घेण्यात आले असून पो.स्टे. भाग्यनगर, जि.नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, डॉ. संजय तुंगार अपर पोलीस अधिक्षक,<br>लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्री. गजानन बोडके, पोलीस निरीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फी कमांक– 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9545531234 | पोलीस उपअधीक्षक 9870145915 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner